## प्रकरण ३ रे

# ‘कोकरउड्या’ व ‘रानपालखी’ आशय

# प्रकरण ३ रे

# ‘कोकरउड्या’ व ‘रानपालखी’ - आशय

## प्रास्ताविक :

‘कोकरउड्या’ आणि ‘रानपालखी’ या आत्मकथनांचा अभ्यास करताना प्रामुख्याने दोन्ही आत्मकथनांचा आशय समजावून घेणे महत्त्वाचे ठरेल. कोणत्याही कलाकृतीची मांडणी करताना त्यातील आशयाला महत्त्वाचे स्थान असते. कलाकृतीची व्याप्ती त्या कलाकृतीतील आशयावरती अवलंबून असते. प्रत्येक कलाकृतीत काही ना काही कथानक असते. ते मांडताना लेखकाने कोणते आशय सूत्र मांडलेले असते हे त्या आशयावरून समजते. ‘कोकरउड्या’ व ‘रानपालखी’ या आत्मकथनात लेखकाला काय सांगायचे आहे, त्यामधील प्रसंग त्याने कसे सांगितले आहेत हे समजण्यासाठी आशय हा घटक महत्त्वपूर्ण ठरतो. म्हणून ‘कोकरउड्या’व ‘रानपालखी’ या आत्मकथनांचा आशय पाहणे इष्ट ठरते. व. बा. बोधे यांनी आलेल्या सर्व अनुभवांचे कथन केले आहे.

अनुभवांचे कथन करीत असताना त्यांनी वापरलेली भाषाशैली, निवेदनशैली, प्रसंग वर्णने, व्यक्तिचित्रणे यांचा अभ्यास करण्यासाठी आशयाचे स्वरूप मांडणे महत्त्वाचे वाटते म्हणून वाङ्मयीन मूल्यमापनाच्या दृष्टीने आशय मांडणे क्रमप्राप्त ठरेल. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणात आत्मकथनांचा आशयाच्या अंगाने विचार मांडला आहे.

## ‘कोकरउड्या’ आत्मकथनाचा आशय :

आभाळभर ढगांनी रिंगण धरले होते. पावसाच्या धारा कोसळत होत्या. साऱ्या मुलकात पाऊस पडत होता. अशा परिस्थितीत इट्टल वाडीच्या मावळतीच्या घोलात किसना महिंदाच्या मळ्यातील पाच-सहा खणाच्या झोपड्यात नवऱ्याकडून हाकलून दिल्याली लेक बाजल्यावरती कण्हत हुती. हौसा ज्या बाजल्यावरती झोपली होती त्या बाजल्याचे चारी पाय पाण्यात होते. वरून अंगावर पाणी गळत होते. झोपडीवरचे पांजरण कुजलेले होते. अशा परिस्थितीत हौसा बाळंतीण होते. हौसाला पोरगं होतं ते पोरगं आईबापापेक्षा उजवे आणि भोपळ्यासारखे गरगरीत, तेच पोरगं म्हणजे वसंत होय. त्याला आज ग्रामीण कादंबरीकार, कथाकथनकार, एक अभ्यासू प्राध्यापक म्हणून महाराष्ट्राचा काही भाग ओळखतो. त्याच्या भरडलेल्या बालपणाची, किशोरवयाची ही कहाणी-नेटक्या वयापर्यंत नेणारी.

वसंता मामाच्या मळ्यात वाढू लागला. मामाच्या घराभोवती भरपूर हिरवीगार झाडे, विहिरीचे पाणी होते. वसंताला खेळण्याच्या नादात जेवणाचेही भान नसायचे. एवढा तो लहानपणी खेळकर होता. चार-पाच वर्षांचा होईपर्यंत वसंता मामाच्या गावी होता. तोपर्यंत वसंताचे वडील त्याला कधी भेटायला आले नव्हते. आई मात्र वसंतासाठी कष्ट उपसायची. कधीसुद्धा बसून रहायची नाही.

वसंताच्या आईला सासरच्या लोकांनी माहेरी हाकलून दिले होते. त्यामुळे तिला माहेरी खूप कष्ट करावे लागत होते. माहेरी दारिद्रय होतं. मिळेल त्या भाकरतुकड्यावरती हौसा मुलाचा सांभाळ करीत असे. वसंताला लहानपणी रानात भटकण्याचा छंद होता. असाच एक दिवस मळ्यातील विहिरी शेजारील झाडीत फिरत असताना विहिरीवरील पारवे मारण्यासाठी शिकारी येतो. वसंता अचानक त्या शिकाऱ्याच्या पुढे येतो. तेवढ्यात शिकारी गोळी झाडतो. पण गोळी वसंताच्या पाठीमागून जाते. म्हणून वसंता त्या प्रसंगातून वाचतो. वसंताला मामाच्या घरी कशाची कमतरता नव्हती. पण आईला खूप काम करावे लागत होते.

वसंताला वसंताची आजी शेंगाची राखण करण्यास सांगते. पण मुले खेळण्याच्या नादात असतात. त्यावेळी शेंगात म्हैस शिरते. वसंताने दगडाने शेंगा फोडल्या होत्या. त्यामुळे वसंताला मारतात. वसंता रुसून गीडगापात रानगाडव खाऊन झोपतो. त्यावेळी त्याला खूप शोधतात. वसंताला जाग येते. रात्रीची वेळ होती. म्हणून वसंताला राड्याकाका घरी पोहचवतात. त्यावेळी आईला घरातील माणसे खूप बोलतात. तिला म्हणतात, ''तुझी पोरं घेऊन तुझ्या घरी जा'' असे सांगतात. आईला खूप वाईट वाटते.

दिवस उगवल्यावर हौसा दुधी गावची वाट चालू लागले. दुधी हे हौसाचे सासर होते. हौसा घरी जाते. पण तिथे सासू लगेच भांडणास सुरुवात करते. माहेरी जा म्हणते. हौसाला माहेर व सासर म्हणजे पुढे आड व मागे विहीर अशी होती. शेवटी हौसा सासरीच राहते. तिला तेथेसुद्धा त्रास सहन करावा लागतो. सासू, सासरा, दीर तिला मारहाण करतात. भात उकडला की, सासू तिच्या पोरांना जेवायला वाढते; पण हौसाच्या पोरांना देत नाही. अशा परिस्थितीत हौसा मुलांना स्वतःच्या हिमतीने सांभाळते. एके दिवशी सासूने स्वयंपाकाचे निमित्त करून हौसाला पावसात मुलांसह घराबाहेर काढले. हौसा खूप विनंती करते तरी सुद्धा तिला हाकलून देतात. त्यावेळी हौसाला मोठी दोन व लहान एक अशी तीन मुले होती.

हौसाला पावसात घराबाहेर काढले, तेव्हा ती पोरांना घेऊन गावातील मशिदीत जाते आणि त्यावेळी तिला एकदम उत्तमची आठवण येते आणि 'आरं माझ्या कर्मा' म्हणून रडते आणि म्हणते 'आरं माझ्या बाळांनू धाकटा उत्तम पाळण्यात राहिला .... देवा परमेश्वरा .... आता काय करू मी.' (कोकरउड्या, पृ.२६) भांडणाच्या पायात तिला पोटच्या मुलाची शुद्ध रहात नाही असे अनेक प्रसंग या आत्मकथनामध्ये येतात.

उजाडल्यावर हौसा सातारला नवऱ्याकडे जाते. हौसाचा नवरा सरकारी खात्यात पोलीस होता. पण त्याला बाईचा, मटक्याचा नाद होता. हौसा नवऱ्याकडे जाते. त्यावेळी तो बाईला घेऊन बसलेला होता. ते पाहून त्याला म्हणते, ''अजून हौस फिटली नाय व्हय ? कण्यारीच्या मुळ्या टेचून पाजा आमाला. जलमभर बाया ठेवा, काय लाज आबरू? सोन्यासारखी नोकरी. तीन पोरं मी म्हणती माणसानं ध्यान धरावं मागच्या दिसाचं.'' (कोकरउड्या, पृ. २५) त्यावेळी तिच्या नवऱ्याने साधी मुलाबाळांची चौकशी सुद्धा केली नाही. उलट हौसाला रक्त येईपर्यंत चप्पलने मारले. शेवटी मुलांना घेऊन हौसा माघारी येते. मुलांना भूक लागते. त्यावेळी पायातील जोडवी मोडून त्यांना खाऊ देते.

थोड्याच दिवसांत बापूंचे पत्र येते. त्यावेळी हौसाला मोठा आनंद होतो. पुन्हा हौसाने दुधीला जायची तयारी करून ती दुधीत येते. त्यावेळी बापूंची नोकरी सुटली होती. त्यांनी स्वत: कष्ट करून जुन्या घराशेजारी नवीन तीन खोल्या बांधल्या होत्या. पण त्यांची नोकरी सुटल्याने त्यांची परिस्थिती वाईट होती. अंगावरती फाटकी कपडे, गळ्यात फाटका रुमाल, दाढी वाढली होती. पोटची पोरं सुद्धा त्यांच्याकडे जात नाहीत. शेवटी हौसा सांगते तुमचे वडील आहेत. त्यामुळे मुले त्यांच्याकडे जातात. काही दिवस हौसा एकत्र कुटुंबात राहते. पुन्हा घरातील कटकटीमुळे स्वतंत्र राहतात. बापूंना नोकरी नसल्याने ते सतत नोकरीच्या शोधात असायचे. दिवस दिवस घराबाहेर फिरायचे. येताना धोतराच्या सोग्यात शेर मापटे ज्वारी आणायचे.

एक दिवस बापू मुलांना शाळेत घालतात. मुले शाळेत जाऊ लागतात. त्यांना खोटे बोललेलं व चोरी केलेली आवडत नसे. वसंताने एकदा महादेव सुताराच्या शेतातील बटाटे चोरून आणले होते. त्यावेळी बापूंनी हौसा बाळंतीण असूनसुद्धा तिला लाकडाने मारले होते. असंच एके दिवशी पोस्टातून पोस्टमन येतो. त्याने पत्र दिले. नोकरीचे होते. पुन्हा बापूंना नोकरी लागते. थोडे दिवस चांगले जातात. पुन्हा बापूंचे कुटुंबावरती दुर्लक्ष होते. शेती पिकत नव्हती, जमिनीत कष्ट करून पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. घरात अन्नधान्याचा वानवा भासत. शेतात पिकलेलं धान्य महिन्याभरात संपायचं. पुन्हा हौसाला रोजगार करावा लागतो.

पावसाळ्यात वसंताच्या घरची चूल चार-चार दिवस पेटत नसे. इतकी वाईट वेळ वसंताच्या कुटुंबावरती येते. एके दिवशी वसंता घरी येतो. त्यावेळी प्रकाश भाकरीसाठी भूणभूण करीत होता. एका भाकरीचे पीठ होते. तेवढी आई करून देते. वसंताला भाकरी नसते. म्हणून वसंता मित्राच्या मदतीने गावातून धोंडी काढतो. स्वत: वसंता त्यावेळी धोंडी होतो आणि गावातून धोंडी घेऊन प्रत्येक घरातून भाकरी मिळवतो. त्यावेळी वसंताचे मित्र मोठ्याने म्हणतात,

''आभाळ भरलंय पाण्यानं पाण्यानं
कणगी भरल्या दाण्यानं दाण्यानं'' (कोकरउड्या, पृ. ६०)

अशी बिकट परिस्थिती वसंताच्या घरी येते. धोंडीला मिळालेली भाकरी वसंता व त्याचे मित्र ओढ्यावर जाऊन खातात. भूक लागली की, वसंता कधी कधी ओढ्यात खेकडे धरून भाजून खायचा. अशा अनेक वाईट प्रसंगांतून वसंताला मार्ग काढावा लागतो. त्याची आई रोजगार करून मुलांना वाढवते. पडत्या पावसातही चार घरे फिरून उसने पासने पीठ आणून मुलांना भाकरी करून देते. प्रसंगी घेवड्याच्या शेंगा चवाळी उकडून त्यात मीठ टाकून देते. पण त्यांना मोठे करते.

वसंता एकदा दुपारचा शाळेतून घरी आला तेव्हा त्याच्या आईने चहा केला होता. त्यातला थोडा प्रकाशला दिला. तेवढ्यात वसंता आला व आईला चहा मागतो. पण घरात दूध नसते. म्हणून ती जेवण वाढते; पण वसंताला चहा हवा असतो. वसंताची आई त्याला समजावते. परंतु तो ऐकत नाही. म्हणून वसंताला मारण्यासाठी त्याची आई चुलीतील लाकूड घेऊन धावते.

सातवीच्या परीक्षेला जाण्यासाठी चांगले कपडेसुद्धा नव्हते. एकाच ड्रेसवरती वसंता परीक्षा देतो. वसंता सातवीत चांगल्या मार्कांनी पास होतो. शिरंब्याला शाळेत जातो. अभ्यासात रमून जात शिरंब्याच्या शाळेतील शिक्षक त्याच्यावरती चांगले संस्कार करतात. वसंत शिक्षकदिना दिवशी शिक्षक होतो. त्यावेळी त्याचे सर्वजण शिक्षक कौतुक करतात. दहावीपर्यंत वसंत शिरंब्यात शिकतो. त्यावेळी वसंताला परीक्षा फीचे पैसेसुद्धा वेळेत भरता येत नव्हते. स्वत: वसंता काम करून पैसे भरत होता. अशा परिस्थितीतून वसंता दहावी पास होतो.

वसंता पास झाल्याचे बापूंना समजते. त्यांना आनंद होतो. बापू टपाल पाठवून मुलांना कॉलेजला जावा असे सांगतात. त्यावेळी प्रकाश व वसंता कराड येथे कॉलेजला जातात. स्वत: हाताने स्वयंपाक बनवून खातात. बापूंनी व आईने दिलेल्या थोड्याफार पैशावरती वसंताची व प्रकाशची शिक्षणाची सोय होते. पुढे वसंता बारावी पास होतो; पण प्रकाश नापास होतो. त्याचे मित्रसुद्धा नापास होतात.

वसंताला नाटके पाहण्याचा खूप छंद होता. त्यासाठी तो खटपटी करून नाटक पहात. 'पास नावाचा देव' या नाटकाचे पुस्तक छापण्यासाठी स्वत: वसंताने पावती पुस्तक छापले व त्या पावत्या खपण्याासठी मित्रांची मदत घेऊन त्याने पुस्तक छापले. वसंता गणपतीच्या उत्सवात कधी झोपत नव्हता. कराडातील सर्व कार्यक्रम पहात वसंता शेवटच्या वर्षाला गेला. त्यावेळी 'जळात राहून माशाशी वैर' हे तीन अंकी नाटक लिहितो. त्याला म. बा. भोसले यांची प्रस्तावना देतो. गॅदरिंगला तेच नाटक बसतो. प्रयोग छान होतो. वसंताचे कौतुक होते. पण पुस्तक छापण्यासाठी वसंता आईला पैसे मागतो. त्यावेळी स्वत: आई बोकड विकून वसंताला पैसे देते. आईला फार वाईट वाटते. पण मुलासाठी ती शेळीचं बोकड विकते.

टी. वाय. बी. ए. च्या निरोप समारंभात वसंताच्या पुस्तकाचे प्रकाशन होते. त्याचकाळात वसंताला कॉलेजमधील एक मुलगी आवडते. तिला भेटण्यासाठी पुस्तकाचे निमित्त करून वसंता भेटण्यास जातो. पण तिच्या वडिलांनी वसंताचा अपमान केला. तेव्हापासून वसंताने प्रेमाचे नाव काढायचं नाही अशी प्रतिज्ञा केली. अभ्यास जोमाने करून वसंत बी. ए. पास झाला. पण नोकरी मिळाली नाही. त्याला खूप वाईट वाटते.

वसंता रोज कोरेगावला जाऊन वृत्तपत्र चाळत असे. प्रत्येक ठिकाणी अर्ज करी. पण त्याला नोकरी मिळत नव्हती. शेवटी मे महिन्यात वसंताने दोन नाटके लिहिली. एके दिवशी वसंताला खटावच्या हायस्कूलवरती बोलावणे येते. वसंत मुलाखतीस हजर राहतो. पण अपेक्षित उत्तर येत नाही. प्रत्येक ठिकाणी अपयशय येते. त्याची आई रोज रानात घाम गाळून त्याला पैसा देते. वसंताचा मोठा भाऊ नोकरी करत होता. वसंता मात्र घरीच होता. नोकरी नसल्याने त्याच्या मनात अनेक विचार येतात. स्वत: ठाम विचार करून तो एके दिवशी स्वत:च्या पुस्तकाच्या प्रती घेऊन पुस्तक खपविण्यासाठी गावोगाव फिरतो. पुस्तक विकून पैसा मिळवण्यासाठी खटाव, पुसेगाव, वडूज, सातारा, कोरेगाव, दहिवडी अशा जवळपासच्या गावी फिरतो. प्रसंगी एस. टी. स्टँडवर झोपतो. पण प्रतिसाद फारसा मिळत नाही. शेवटी सातारा, पाटण, वाई, इस्लामपूर, सांगली, आष्टा, तासगाव अशी गावे पडत्या पावसातही फिरतो. परंतु पुस्तक खपण्यापेक्षा त्याला नको ते उपदेश ऐकायला मिळतात. वसंता नाराज होऊन घरी येतो.

एके दिवशी प्रकाश वसंताला त्याची सर्व कागदपत्रे घेऊन रहिमतपूरच्या बाबासाहेब माने यांच्याकडे जातो. त्यांच्या राधाकृष्ण हायस्कूलवरती शिक्षक भरायचा होता. बाबासाहेब यांनी

मानगावकर सरांना भेटण्यास सांगितले व १६ ऑगस्ट १९७१ ला मुलाखत होते. वसंताची शिक्षक म्हणून राधाकृष्ण हायस्कूलवरती नेमणूक होते. १८ ऑगस्टची ऑर्डर घेऊन वसंता घरी येतो. घरात सर्वांना आनंद होतो. वसंताने पहिला १२ दिवसाचा पगार एकशे पाच रुपये घेतला. आता वसंताच्या कुटुंबावरती थोडे सुखाचे दिवस येतात. पहिल्या पगारात प्रकाशचे पन्नास रुपयास गहाण पडलेलं घड्याळ सोडवतो. वसंताच्या आईला समाधान वाटते. आता वसंताचा उत्साह वाढला होता.

हायस्कूलवरती वसंता चांगला रमतो. लहान-लहान गुणी मुलांना तन्मयतेने वसंता शिकवतो. नोकरीचे पहिले वर्ष वसंताला चांगले जाते. नोकरीच्या दुसऱ्याही वर्षाची सुरुवात चांगली होते. पगार वेळेवर होत असल्यामुळे घरात हातभार लागायचा. अंगावरती कपडे चांगली मिळत होती. वसंता रहिमतपुरातच रहात होता. गावतील चार-पाच मुले वसंताच्या खोलीत रहात होती. गावातून न चुकता वसंताला डबा येत होता.

वसंताचे लेखन वाचन चांगले होते. वसंताची लोकप्रिय 'फिस्ट' कथा तिथेच लिहिली होती. त्याचवर्षी ललित सत्यकथान 'प्रतिष्ठान' या नियतकालिकेचे अंक वसंताने झपाटून वाचले होते. वाचनावरती व लेखनावरती वसंताचा जोर होता. 'मधुलहरी' हस्तलिखित तयार करण्यासाठी वसंताकडे मुले व मुली येत. त्यातील एका सुंदर मुलीने वसंताचे लक्ष वेधून घेतले. एकीकडे वसंतातील ग्रामीण कथाकार जागा होत असतानाच वसंता त्या सुंदर मुलीत गुंततो. वसंताला लेखनापेक्षा ती मुलगी महत्त्वाची वाटू लागली. वसंता तिचाच विचार करण्यात खूप वेळ घालवत होता.

वसंताला भेटण्यासाठी ती मुलगी सुरुवातीला काहीतरी कामाचे निमित्त करून येत असे. नंतर मात्र वसंताला वारंवार भेटत. अशातच जवळीकता वाढते. दोघांचे एकमेकांत मन गुंतते. कालांतराने प्रकरण वाढते. शेवटी गावभर चर्चा होती. एक दिवशी दुपारची ती मुलगी येऊन वसंताला पेढा देऊन म्हणते, ''मला बघायला पाहुणे आलेत.'' वसंताला वाईट वाटते. गावातील टवार मुलांनी वसंतावरती नजर ठेवण्यास सुरुवात केली. त्याचकाळात वसंताने प्रेमाचे चित्रण करणारी 'प्रश्न' नावाची कथा एका फालतू मासिकातून प्रसिद्ध केली होती. त्या कथेने वसंताच्या जीवनात प्रश्न निर्माण केले

येता-जाता गावातील मुले सांकेतिक भाषेत वसंताला वात्रट बोलू लागली. प्रकरण वाढत जाते. त्यावेळी वसंताच्या मागे फक्त संपत बानूगडे उभा राहतो. मार्चचा शेवटचा आठवडा उगवला. एक दिवस वसंताला नोकरीवरून कमी केल्याची नोटीस हातात पडते. त्यावेळी वसंताला खूप पश्चात्ताप होतो. त्यावेळी वसंताच्या विरोधात वातावरण तापते. एका पोराने वसंताला येऊन सांगितले, ''गांधी

चौकात तुम्हाला मारण्यासाठी पोरं थांबल्याती.'' हे ऐकून वसंताच्या अंगावर काटा उभा राहतो. वसंताचे हातपाय थरथर कापू लागतात. ज्या गावात मुलांचे प्रेम मिळाले. वक्तृत्वाची साधना केली, नाव मिळवून देणारी फिस्ट सारखी कथा लिहिली. त्या वसंतावरती असा प्रसंग उभा राहतो.

वसंता शेवटी खोलीला कुलूप लावून पिशवीत चार पुस्तके घालून गावाकडे निघतो. बाकी सर्व सामान खोलीतच राहते. वसंता खाली मान घालून स्टॅण्डवरती येतो. वसंताला कुणीतरी दम देईल असे वाटले पण तसे घडले नाही. रहिमतपूरहून गाडी निघाली. वसंताच्या मनावरचा ताण कमी होतो. वसंताला वेड्यासारखे वाटू लागले. सोन्यासारखी नोकरी गेली याचे त्याला वाईट वाटते. मरणाचा उन्हाळा होता. वसंताने अंबेगावची जाहिरात वाचली. पुणे गाठले. सोबत रमेश होता. वसंताने स्वत:ची पुस्तके घेतली. मोकळ्या वेळात पुस्तके विकण्याचा विचार केला. वसंत व रमेश काही दिवस पुण्यात गावातील नाना भाऊकडे राहतात. त्यांच्या मदतीने नोकरीचा प्रयत्न होतो. पण नोकरी मिळत नाही. भरतीसाठी चार वेळा वसंता उभा राहतो. परंतु धाप लागते. म्हणून त्याला काढले जाते. साधी स्टोअर किपर म्हणून सुद्धा नोकरी वसंताला मिळत नाही.

त्यामुळे त्याच्या डोक्यात आत्महत्त्येचा विचार येतो. त्या विचारात वसंत पुण्याहून गावी येतो. येताना त्याला औषधाचे दुकान लागते. त्याच दुकानात जाऊन वसंता सर्वात जास्त विषारी ढेकणाचे तीन रुपयाचे नॉक ९९ घेतो. गावाला आल्यावरती वसंताची आई त्याला रागावते. त्यावेळी प्रकाश तिला शांत करतो. वसंताच्या डोक्यात मात्र आत्महत्त्येचा विचार घोळत होता. दुसऱ्या दिवशी वसंता रहिमतपूरला पगार आणण्यासाठी जातो, असे सांगतो. घरातून निघताना वसंताने न विसरता विषारी औषध जवळ घेतले होते. वसंता रहिमतपूरला येतो. स्टॅण्डवरून तो राधाकृष्ण हायस्कूलमध्ये जातो. ज्या गावाने बदनाम झालो, त्या गावातच जीवन संपवायचं. वसंताने अखेर विषारी औषधाची बाटली तोंडाला लावली. विषारी औषध वसंताला भिनले. परंतु वसंताला पुन्हा जगण्याची इच्छा होती. वसंताची अवस्था वाईट होती.

वसंताच्या तोंडातून लाळ गळू लागते. त्याला उलट्या होतात. अशा अवस्थेत वसंता बाबासाहेब माने यांच्या वाड्यात येतो. त्यावेळी त्याला उलटी होते. वसंता दीदींना व बाबासाहेबांना औषध पिल्याचं सांगतो. ती तशी दोघेही देव माणसे. त्यांनी वसंताला सरकारी इस्पिताळात नेले व डॉ.लाड यांनी लगेच उपचार केले. म्हणून वसंता वाचतो. स्वत: बाबासाहेब त्यांना स्वत:च्या गाडीने घरी पोचवतात. नंतर हे प्रकरण मिटते. वसंताच्या आईला खूप वाईट वाटते. ती वसंताला रागावते व

म्हणते, ''आरं उपाशीपोटी चिमणीगत पोरं दातात धिऊन हिंडली म्या .... पर न्हाय कवा जीव घ्यावासा वाटला, मर्दासारखा मरद तू ... ढेकणाचं औषध पेतुयास भाड्या. काय लाज जिवाला.'' (कोकरउड्या, पृ.१९४) आई रडते. वसंतालाही त्या प्रकरणाचा त्रास होतो.

दोघा भावांना नोकरी मिळताच दोन भाऊ दोन दिशांना जातात. वसंता एकटाच घरी, आई व बहीण राजेगार करून संसार चालवत. वसंताला याचे वाईट वाटते. तो सतत नोकरीचा विचार करत नोकरी नाही व ती मिळेल याची खात्री नाही. मग कथाकथनाचे कार्यक्रम करावे. असे वसंताला वाटते. नंतर त्याने प्रत्यक्ष कथाकथनाचा कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. धामणेरच्या शाळेत कथाकथनाचा पहिला कार्यक्रम केला. पंधरा रुपये मानधन मिळत होते. असे आसपासच्या परिसरात वसंताने अनेक कार्यक्रम केले. मिळणारा पैसा वसंता आईला देतो. त्यावेळी तिला आनंद होतो.

प्रकाश व उत्तमसुद्धा नोकरी करीत होते. त्यांचा वसंताच्या शिक्षणास हातभार होता. म्हणून प्रकाश वसंताला एम. ए. साठी विद्यापीठात प्रवेश घेऊन देतो. थोड्याच दिवसात वसंता कोल्हापुरात रमतो. काही दिवस वसंता मित्राच्या रूममध्ये राहतो. नंतर मात्र स्वत: रूम करून राहतो. त्यावेळी पैशाची अडचण होतीच. पण वसंता कथा छापून आणत. त्यामुळे त्याचा खर्च त्या थोड्या पैशावरती भागत होता.

त्याचे अभ्यावरती चांगले लक्ष होते. पहिले वर्ष संपत आले. परीक्षा तोंडावर येतात. वसंता मनसोक्त फिरतो व अभ्यासाला गावी येतो. त्यावेळी त्याच्या पायाला जखम होते. त्याचा त्याला खूप त्रास होतो. दोन महिने वसंताने अंथरुणात काढले. अनेक गावठी उपाय केले. त्यावेळी त्याला उपाय नावाची कथा सुचवते. त्या कथेला स्पर्धेसाठी पाठवतो. तिला द्वितीय पारितोषिक मिळते. पुढारीत वसंताचा फोटो येतो. वसंताला खूप समाधान वाटते. त्याचकाळात वसंताने चकार नावाची ग्रामीण कथा लिहिली. तरुण भारतला वासंतिक कथा स्पर्धा भरली होती. तिला पाठवतो. त्याही कथेला पुरस्कार मिळतो.

वसंताला एम. ए. चे दुसरे वर्षही छान जाते. वसंता लेखनात, वाचनात, वक्तृत्वात, कथाकथनाच्या कार्यक्रमात स्वत:ला गुंतवून घेतो. गावाला आधीमधी यायचा त्यावेळी त्याला आईच्या कष्टाचे वाईट वाटे. वसंताची आई नेहमी कामात असायची. वसंताला पैशाची अडचण आली की वसंता गावी जात असे. वसंताला आईकडे पैसे मागण्याची लाज वाटते. पण मिळेल त्या पैशावरती वसंता दिवस काढत. पडत्या काळात वसंता कथाकथनाचे कार्यक्रम करून खानावळीचे पैसे भागवतो.

वसंताचा मित्र इरागोंडा पाटील हा सुद्धा अभ्यासू होता. त्याला काव्य वाचनाचा छंद होता. त्यामुळे वसंता व इरागोंडा हे दोघे कार्यक्रम करून पैसे मिळवत होते. त्यांची शिक्षणाची जिद्द मोठी होती. त्यांनी कार्यक्रमपत्रिका छापून घेतल्या. व कोल्हापुरातील सर्व हायस्कूलमध्ये कार्यक्रम करण्यावर भर दिला.

वसंताला प्रकाशचे पत्र येते. तो कार्यक्रमासाठी दोघांना कोकणात बोलवतो. वसंता व पाटील अभ्यासाची पुस्तके घेऊन कोकण गाठतात. त्याही भागात कार्यक्रम करतात. परीक्षा होते. त्याचवेळी वसंताच्या भावाचे व बहिणीचे लग्न ठरते. पण प्रकाश ठरलेले लग्न मोडतो. सर्वांना वाईट वाटते. शेवटी कौसाचे लग्न होते. बहिणीच्या लग्नातून वसंता मोकळा होतो. कोल्हापूरला असतानाच वसंताने बावीस ठिकाणी अर्ज टाकले होते. परंतु घरी बसून काय करायचे म्हणून वसंता कोरेगावला जायचा. वर्तमानपत्रात एखादी जाहिरात असली की अर्ज करायचा. प्रत्येक ठिकाणी मुलाखतीस जायचा.

वसंता नोकरीसाठी वणवण भटकत असायचा. त्यातच प्रकाशच्या लग्नाची धावपळ होती. वसंताला म्हवसा कॉलेजचा कॉल येतो. त्यादिवशी प्रकाशचे लग्न होते. शिवाय मोठा पाऊस येतो. शेवटी वसंताला मुलाखतीस जात येत नाही. प्रकाशचे लग्न होते. नंतर प्रकाशने वसंताला नोकरीसाठी कोकणात नेले. वसंताची 'नवजीवन विद्यालय, शिव' येथे निवड होते. कोकणातील वातावरणात वसंता थोड्याच दिवसात रमू लागतो. वसंताच्या राहण्याची, खाण्याची सोय होते. शाळेच्या वसतिगृहात रहातो. त्या भागातील सर्व समाज हा मुस्लिम होता.

सुरुवातीला काही दिवस वसंताला घरची आठवण येते. आईची काळजी वाटते. कालांतराने वसंता त्या विद्यार्थ्यांत रमून जातो. त्या विद्यालयातील प्राचार्य, वसंताची नेहमी चौकशी करायचे. साहित्यावरती चौकशी करायचे. त्याचबरोबर पेंडसे मॅडम, शररू जौरे इतिहासाचे प्राध्यापक याची चांगली सलगी होती. वसंता शिव बंदरात चांगला रमून जातो. विद्यार्थ्यांना मन लावून शिकवत होता. वसंताचे तिथेही एका मुलीत मन गुंतले. ते प्रकरण प्राचार्य दळवी यांच्यापर्यंत पोहचते. पण दळवी प्राचार्य स्वभावाने चांगले. त्यांनी वसंताला विचारले. वसंताच्या घरची चौकशी केली. प्राचार्यांनी त्यांना लग्नासाठी तयार केले. त्यासाठी स्वत: पुढाकार घेतला. वसंताला सांगून प्रकाशला बोलावून घेतात.

दळवी सर वसंताला व प्रकाशला घेऊन त्या मुलीचा तपास करून तिच्या घरी जातात. तिच्या घरातील लोकांना सर्व गोष्टी सांगतात. लग्नासाठी रीतसर मागणी घालतात. पण ती मुलगी पर जातीची होती. त्यामुळे त्या मुलीचे वडील नकार देतात.

प्रकाश वसंताला समजावून सांगतो. पुढे त्या मुलीचे कॉलेज बंद होते. वसंताला त्याचा पश्चात्ताप होतो. एक दिवस वसंताला त्या मुलीचे पत्र येते. तिला ही खूप पश्चाताप होतो. थोड्याच दिवसात परीक्षा येतात. ती मुलगी परीक्षेला येईल असे वाटते. पण येत नाही. शेवटी परीक्षा झाली. पेपर तपासून वसंता सुट्टीला गावाला येतो. सोबत प्रकाश होताच. त्याने वसंताला दुसरीकडे अर्ज करायला सांगितले. प्रकाशराव हा वसंताच्या नावावरती अर्ज पाठवायचा. उन्हाळ्याची सुट्टी संपवून दोघे भाऊ नोकरीसाठी कोकणात जातात. वसंता कॉलेजवरती जातो. त्याला कॉलेज बंद पडल्याचे समजते. शेवटी वसंताच्या पुढे पुन्हा नोकरीचा प्रश्न निर्माण होतो.

दळवीसर वसंताला शिक्षणाधिकाऱ्याला भेटण्यास रत्नागिरीला पाठवतात. पण तेथेही वसंताची दखल घेतली नाही. वसंताला खूप वाईट वाटते. वसंता पुण्याला इरागोंडाकडे जातो. त्याच्या सोबत पुण्यात दोन दिवस राहतो आणि रेल्वेने गावी येतो. येताना त्याला निरा स्टेशन भेटते. तेथेच वसंता उतरतो. तेथून सोमेश्वराला जातो. प्रकाशने वसंताच्या नोकरीचा अर्ज सोमेश्वरच्या कॉलेजवरती टाकला होता. त्यामुळे वसंता त्या कॉलेजवरती जातो. त्यावेळी त्याला घोरपडे सर भेटतात. ते कॉलेजवरती ग्रंथपाल होतो. त्यांनी वसंताला प्राचार्य आठवले बाई यांच्याकडे नेले. त्यांनी वसंताची चौकशी केली. वसंताची कागदपत्रे मनापासून चाळली. वसंताची एक-दोन पुस्तके चाळली. आम्ही कळवू असे म्हणतात. वसंता कोकणातील पत्ता देतो व पुन्हा शिवबंदर गाठतो.

थोड्याच दिवसात वसंताला पत्र येते. वसंता लगेच सोमेश्वरच्या मुसा काकडे या महाविद्यालयात जातो. नवीन प्राचार्य घुनळीकर त्याची निवड करतात व वसंताला २६ जुलै १९७६ ला अपॉइंटमेंट ऑर्डर देतात. वसंता सुखावतो. गावी येतो. घरी आनंद होतो.

दुसऱ्या दिवशी वसंता कोकणात प्रकाशाकडे जातो. त्याला भटतो व शिवबंदरला नवजीवन विद्यालय गाठतो. दळवी सरांना भेटतो. सर्वांना आनंदाची बातमी सांगतो. सर्वांना आनंद होतो. दळवी सरांना खूप वाईट वाटते. वसंताचा दुसऱ्या दिवशी निरोप समारंभ होतो. सर्वजण वसंताला निरोप देतात. वसंताला खूप वाईट वाटते. निरोप घेऊन वसंताने त्या शाळेच्या भव्य इमारतीकडे पाहिले व हात जोडले.

खोलीवर येऊन वसंताने सर्व सामान घेतले व सर्व सहकारी मित्रांना पत्र पाठवण्याचे वचन देऊन खोपी गाठली. प्रकाशला भेटून वसंता कोकणातील साऱ्या हिरव्यागार निसर्गाचा निरोप घेऊन सोमेश्वरकडे निघतो. वसंता आता कर्मभूमीकडे भवितव्य घडविण्यासाठी सोमेश्वर या ठिकाणी जातो.

**निष्कर्ष :**

१. कोकरउड्या या आत्मकथनातून वसंत या नायकाने जन्मापासून ते प्राध्यापक होईपर्यंतचा जीवनपट मांडलेला आहे.

२. वसंत ही दारिद्रयात जन्माला आलेली व दारिद्र्यात वाढलेली व्यक्तिरेखा आहे.

३. कोकरउड्या आत्मकथनातील व्यक्तिरेखा ग्रामीण समाज जीवनातील असल्याने त्यांच्या निवेदनातून येणारी भाषा ही ग्रामीण स्वरूपाची आहे. त्यामुळे कलाकृतीला एक प्रकारचा जीवंतपणा येण्यास मदत होते.

४. वसंताला स्वत:चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले आहे. याचा प्रत्यय कोकरउड्यातून येतो.

५. हौसा ही कोकरउड्या या आत्मकथनातील प्रभावी व्यक्तिरेखा असून वसंताला घडविण्यात तिचा महत्त्वाचा वाटा आहे.

६. व. बा. बोधे यांचे बालपण ग्रामीण भागात गेल्याने त्यांच्या बालमनावरती ग्रामीण संस्कृतीचा ठसा उमटला आहे. त्यामुळे ग्रामीण संस्कृतीचे यथार्थ चित्रण कोकरउड्यातून झाले आहे.

७. कोकरउड्यातून ग्रामीण भागातील खेळांचे तसेच ग्रामीण समाजजीवनात म्हटल्या जाणाऱ्या गीतांचा अंतरभाव कोकरउड्यातून चपखलपणे लेखकाने केला आहे.

८. प्रस्तुत आत्मकथनात ग्रामीण जीवनातील कृषीसंस्कृती, शेतीत घेतल्या जाणाऱ्या पिकांचे व प्राण्यांचे वर्णन कोकरउड्यात आहे.

९. कोकरउड्या या आत्मकथनाचे शीर्षक आशयाला सुसंगत आहे.

१०. कोकरउड्यातून व. बा. बोधे यांचे बालपण ते प्राध्यापक होईपर्यंतचा प्रवास व त्या प्रवासात लेखकाच्या मनातील विविध आंदोलने अतिशय वास्तव स्वरूपात मांडली आहेत.

११. प्रस्तुत आत्मकथने (कोकरउड्या व रानपालखी) व. बा. बोधे यांनी अतिशय तटस्थपणे रेखाटली असल्यामुळे आत्मकथा लेखनाचा वाङ्मयीन ढाचा लेखकाने तंतोतंत सांभाळलेल्या असल्याचे जाणवते.

# 'रानपालखी' या आत्मकथनाचा आशय

लेखक सोमेश्वरच्या मु. सा. काकडे या महाविद्यालयातील प्राध्यापक म्हणून २६ जुलै १९७६ रोजी हजर झाले. कारखान्यापासून थोड्याच अंतरावर असलेले कॉलेज व त्यासमोरील बाग ही लेखकाची आवडती ठिकाणे.

सोमेश्वर गाव तसे बकाल होते. एका बाजूला कॉलेज व दुसऱ्या बाजूला कारखाना. एवढीच काय ती सुधारणा झाली होती. या परिस्थितीचे वर्णन करताना लेखक म्हणतात, ''खडकावर मरीआयचा गाडा टाकल्यासारखं .... बघाव तिकडे ओसाड धूळ मरणाची. एकटेपणा प्रखरतेने जाणवायचा.) मी रहायचो जर्मन शेडला एकात एक तीन खोल्या. रचना मालगाडीच्या डब्यासारखी. मधल्या खोलीतील माणूस रताळासारखा उकडून निघेल अशी तऱ्हा.'' (रानपालखी, पृ.५) अशा परिस्थितीत लेखक तिथे राहू लागले.

लेखकाच्या अगोदर त्या ठिकाणी इंग्रजी विषयाचे अभ्यासू प्राध्यापक व्यवहारे सर रहात होते. लेखक आल्यानंतर प्रा. मोहनकुमार बारगजे हे अर्थशास्त्राचे शिक्षक भेटतात. बारगजे हा बहुरंगी स्वभावाचा होता. त्यामुळे लेखकाची त्याच्या सोबत मैत्री जुळते. त्या रसिक प्राध्यापकाच्या सान्निध्यात लेखकाने एक वर्ष घालवले.

लेखकाला सोमेश्वरला येऊन दोन-तीन आठवडे झाले. शे-दोनशे विद्यार्थी सोडून त्यांना कोणी ओळखत नव्हते. पण पंधरा ऑगस्ट १९७६ चा दिवस त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. त्या दिवशी संस्थेचे अध्यक्ष बाबालाल काकडे कॉलेजवर येतात. अध्यक्षांच्या सांगण्यावरून शांतीनिकेतन पुढे लेखकाने हजारो माणसांसमोर भाषण केले. हे भाषण त्यांच्या प्राध्यापकीय व्यवसायात महत्त्वाचे ठरले.

जर्मन शेडमध्ये हळूहळू प्राध्यापकांची संख्या वाढू लागते. तेथे अनेक प्राध्यापक येऊन गेले होते. पण बारगजे मात्र लेखकाचा जीवलग मित्र. ते नेहमी बरोबर असायचे. त्यातच त्यांना पंडित नावाचा रसिक प्राध्यापक भेटतो. त्याच्याशीही लेखकाची चांगली मैत्री जमते.

लेखकाने 'पुंगी' नावाचे हस्तलिखित चालू केले होते. प्रत्येक अंक सजविण्याचे काम प्राध्यापक पंडित करत होते. प्राचार्य घुनळीकर ह्या तिघांना विशेष लळा लावत. घुनळीकर म्हणजे सप्तरंगी कलागुणांचा आविष्कार. इंग्रजी इतकेच मराठीवरही त्यांचे प्रभुत्व होते. लेखक त्यावेळी ना. धों. महानोरांच्या कवितेने विशेष भारावले.

लेखकाला सोमेश्वरमध्ये इरागोंडा हा साहित्यप्रेमी माणूस भेटला. त्या दोघांत सतत साहित्याविषयी चर्चा होत असे. लेखकाला साहित्य क्षेत्राच्या जडणघडणीत भेटलेला हा पहिला मित्र होता. लेखकाचा पहिला कथासंग्रह प्रकाशित करण्यासाठी त्याने मोलाची मदत केली होती.

लेखक भिजून येतो. त्यावेळी त्याची आई त्याल गरम पाणी देते. तो चुलीपुढे बसून शेकतो. आई त्याची चौकशी करते. त्यांच्या गप्पागोष्टी रमतात. तेवढ्यात दिव्यातील रॉकेल संपते. त्यावेळी आई म्हणते, ''साऱ्या गावात लाईट पण आपल्यात न्हाय.'' ''घिऊ हळूहळू, बापाचं टपाल आलय बघ. त्या पीटीत आसंल. त्याला नोकरी लागल्याचं कळीव तेवढं. आरं कसाबी असला तरी बाप हाय त्यो.'' (रानपालखी, पृ.१२) त्यावेळी लेखक भिंतीला टेकून शेकत बसला होता. मग त्याच्या मनात लाईटचा विचार येतो. पहिल्या पगारात लाईटला पैसे भरतो. त्या दिवशी गावात पाऊस होता. लेखकाने सुट्टीत गावाकडची कामे उरकून घेतली. लेखकाने आईला सांगितले पुण्यातील एक माणूस माझे पुस्तक छापणार आहेत. त्यासाठी मला पुण्याला जावे लागणार आहे. त्यावेळी आईला आनंद झाला.

वाचनात लेखक रमत. असाच अस्मितादर्श हा दिवाळीचा अंक चाळत असताना त्यांच्या 'गराडा' या कथेजवळ लेखक रेंगाळतो. त्या कथेतील दलित स्त्रियांच्या अत्याचारांची कथा वाचून त्यांच्या मनात आपल्या गावातील लोकांनी दलितांवरील केलेला अन्याय हा आपण कादंबरीत मांडायची कल्पना येते. त्यावेळी 'जंगल' या कादंबरीचा विचार त्याच्या डोक्यात घोळतो.

लेखक पहिला पगार घेऊन गावी येतो आणि प्रथम आपल्या घरात लाईटची सोय करावी म्हणून वीज मंडळात पैसे भरतो. दिवाळीच्या शुभमुहूर्तावर लेखकाच्या घरात लाईट येते. लेखकाने आठ-दहा कथा लिहिल्या. दिवाळी अंकांना पाठवितो आणि 'जंगल' या कादंबरीच्या लेखनापाठीमागे लागतो. लेखक कॉलेज शेजारील टेकडीवर जाऊन लिखाण करत. तेथेचे 'जंगल'चे कच्चे लेखन केले.

कॉलेजवरील सर्व कामे पूर्ण करून लेखक दिवाळीला गावाकडे येतो. त्यावेळी लेखकाच्या घरी आनंदाचे वातावरण होते. लेखकाचे दोन भाऊ, वडील यांची सर्वांची गाठभेट होते. लेखकाच्या वडिलांचा स्वभाव छंदीफंदी असल्यासने त्यांचे कुटुंबाकडे फारसे लक्ष नसायचे. पण त्यांनी आता लक्ष घातलेले होते. त्यांनी नोकरीवरून येताना पैसे आणले होते. सोबत आईला सोन्याचा दागिना (गंठन) आणला होता. शिवाय कर्जाचा बोजा त्यांनी फेडला होता. त्यावेळी लेखकाच्या घरात आनंदाने दिवाळी साजरी होते.

बापू लेखकाला व प्रकाशला बोलावून घेतात. त्यांच्यावरती नवीन घर बांधण्याची जबाबदारी सोपवतात. बापूंनी आणलेल्या पैशातून घर बांधायचे असा विचार होतो. बापूंचा स्वभाव छांदनशी असला तरी त्यांची बुद्धी चांगली होती. बापू लेखकाला घेऊन सातारला जातात. घरात जेवणासाठी स्टीलची भांडी आणतात. लेखकाला कपडे घेतात. त्यावेळी घरातील सर्वांच्या चेहऱ्यावरती प्रसन्नता होती. सर्वांनी मिळून त्या दिवाळीचा आस्वाद घेतला.

दिवाळी होते. बापू सुट्टी संपवून नोकरीस जातात. प्रकाश, उत्तम व लेखक घराच्या कामात गुंतून जातात. आप्पांच्या मार्गदर्शनाखाली घराचे काम सुरू करतात. लेखकाची आई मात्र सतत रानात असायची. थोड्याच दिवसांत घराचे काम तुळवीला येते आणि त्या दोघांची सुट्टी संपते. शेवटी लेखकाला घराचे काम पूर्ण करावे लागते.

कॉलेज व घराच्या कामामुळे लेखक वैतागून जातो. त्यातच लेखकाला स्वत:च्या पुस्तक प्रकाशनाच्या कामानिमित्त पुण्याला जावे लागत होते. कॉलेजचे कामकाज चोख करावे लागे. एकदा लेखक गावावरून येतो. त्यावेळी कॉलेजला जायला वेळ होतो. त्यावेळेस प्राचार्य नुसते रागाने बघतात. त्यावरती लेखक समजून जातो. लेखक कॉलेजच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक नाटके, एकांकिका बसवतो. त्यामुळे त्याचा सर्वांना अभिमान वाटे. लेखकाने मुलांना चांगले घडवले . त्यांच्या नाटकातून चांगले कलाकार पुढे आले.

नोकरीत लेखक स्थिरावतो. त्यामुळे त्यांच्या विवाहाचा विचार घरातील लोक करू लागतात. लेखक एक दोन स्थळे पाहतो आणि शेवटी कण्हेरखेडच्या फाकडे घराण्यातील संस्कारशील मुलीला पसंत करतो व तिच्याशी विवाह ठरतो. थोड्याच दिवसांत लेखकाचा त्या फाकडे घराण्यातील नीता नावाच्या मुलीबरोबर १९७७ साली साध्या पद्धतीने विवाह होतो. लेखक कसलाही हुंडा घेत नाही. देवळात जाऊन विवाह करतो. घरी आल्यावरती देव-देव करून पूजा घालतात. त्या पूजेला गावातील दलितांची पहिली पंगत घालतो. त्यावेळी गावातील व पाहुण्यांतील व्यक्तींचा विरोध स्वीकारून तो दलितांना जेवण घालतो.

लेखकाने लग्नानंतर पत्नीला गावीच ठेवले होते. मात्र आईच्या सांगण्यावरून व स्वत:च्या पोटाचे हाल कमी व्हावेत म्हणून पत्नीला तो स्वत:बरोबर सोमेश्वरला घेऊन जातो. पत्नीला बरोबर नेल्याने लेखकाला आपल्या आईची काळजी वाटते. पगार व्यवस्थित होत असल्याने फार प्रश्न नसायचा. मात्र आपल्या आईला भेटण्यास सुट्टीला यायचा.

पत्नीसोबत असल्यामुळे लेखकाला स्वास्थ्य मिळत होते. लेखनात लेखक चांगलाच रमून गेला. सकाळी कॉलेज दुपारी थोडा आराम. रात्री मात्र लेखन, वाचन असा लेखकाचा दिनक्रम चालला होता. अधून मधून पुण्याला जावे लागत. गावाला थोडेफार लक्ष द्यावे लागत होते. पण अशा धावपळीतून लेखक भरपूर लेखन करीत.

कॉलेजमध्ये एक परिसंवाद होतो. त्या परिसंवादात लेखकाच्या एक विधानाने कॉलेजमध्ये वाद निर्माण होतो. त्यामुळे दोन दिवस कॉलेज बंद राहते. कालांतराने वातावरण शांत होते व कॉलेज सुरळीत होते. मात्र त्या घटनेचा लेखकास खूप त्रास होतो. त्यासच काळात लेखकाची 'जंगल' ही कादंबरी प्रकाशित होते. परंतु ती लेखकाच्या जीवनातील वादळ ठरते. लेखकाने स्वत:च्या गावातील बोधे-इनामदारांनी दलित लोकांच्यावरती केलेले अत्याचार याचे चित्रण त्यांनी 'जंगल' या कादंबरीतून केले होते. दलितांच्या दु:खाला व त्यांच्या अन्यायाला वाचा फोडणे हा लेखकाचा प्रामाणिक हेतू होता. मात्र दलितसुद्धा लेखकाच्या विरोधात जातात. लेखकाला म्हणतात आमची अब्रू चव्हाट्यावर काढलीत तुम्ही. एकीकडे दलितांनी केलेला विरोध आणि दुसरीकडे ग्रामस्थांचा कादंबरीतील उल्लेख यातून सर्व वातावरण लेखकाच्या विरोधात जाते. त्यावेळी अनेक ठिकाणी मोर्चे निघतात.

कादंबरीच्या प्रकाशनास बंदी येते. प्रकाशक व लेखकास त्याचे परिणाम सहन करावे लागतात. त्यांच्यावरती गुन्हा दाखल होतो. लेखकाच्या पुढे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यातच लेखकाला सुखवणारी आनंदाची घटना म्हणजे लेखकाला मुलगा होतो. त्यामुळे कौटुंबिक जबाबदारी वाढते. बाळाचा दवापाणी यात लेखकाचा खर्च वाढतो. त्यांची शारीरिक, मानसिक, आर्थिक ओढाताण वाढू लागली. कॉलेज, घरातील जबाबदारी याने लेखक थकून जात होता. पण त्याने कधी कुणापुढे दु:खाचा पाढा वाचला नाही. त्याकाळात लेखकाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत. नंतर लेखकाला कॉलेजमध्ये त्रास देणे चालू झाले. त्यांच्यावरती अनेक जबाबदाऱ्या टाकल्या जातात. त्यामुळे लेखक हैराण होतो. गावी आई एकटीच असायची. तिची काळजी लेखकाला असायची.

मोटारसायकल घेतल्यामुळे लेखकाची आर्थिक ओढाताण होते. पेट्रोलचा खर्च, किराणा, दुधाचा खर्च, घरातील लोकांना पैसा द्यावा लागतो. त्यामुळे पैसा पुरत नसायचा. तरीसुद्धा लेखक येईल त्या प्रसंगावरती मार्ग काढीत होता. व्याख्यानासाठी लेखक आसपासच्या ठिकाणी जात असे. पण तिथे मानधनाची नेहमी ओरड असायची. लेखक घसा सुकेपर्यंत व्याख्यान देत पण त्याला योग्य मानधन मिळत नसे. जेवणाची सुद्धा ओरड असायची.

लेखकाला गावी जाण्याची आवड असायची. प्रत्येक सुट्टीला लेखक गावी जायचा. त्यामुळे खर्चात भर पडायची. एक दिवस लेखकाच्या घरात मुलांसाठी दूध आणण्यासाठी पैसे नव्हते. मुलांना दुधाशिवय जमत नव्हते. होते तेवढे दूध मुलांना देऊन दोघेजण विचार करीत झोपतात. पण दोघांना झोपसुद्धा लागत नव्हती. शेवटी लेखक दिवाळी अंकांची रद्दी विकून पैसे मिळवावेत असा विचार करतो. पण तसा प्रसंग येत नाही.

दोन महिन्यावरती लेखकाच्या गावची यात्रा येते. लेखकाला गावाविषयी प्रेम आपुलकी होती. गावासाठी काहीतरी करावे असे त्याला नेहमी वाटे. गावच्या जत्रेने लेखकाच्या मनात घर केले होते. लेखक कुठेही असला तरी गावची जत्रा चुकवत नसायचा. जत्रेसाठी चार आठ दिवस अगोदर जात असे. त्यासाठी स्वत: पुढाकार घेऊन गावातील यात्रा साजरी करीत. लेखकाला गावाची आवड असल्याने तो गावी सारखा येत होता. गावात नवनवीन सुधारणा कराव्यात, तरुणांना एकत्र करून काहीतरी प्रगती करावी असे त्याला नेहमी वाटते.

गुढीपाडव्याच्या सणासाठी लेखक आपल्या गावी जातो. त्यावेळी गावातील मारुतीच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराची मीटिंग घेतो. जर वर्षी मीटिंग बसायची. पण नेहमी गावात वाद व्हायचा. यावर्षी सुद्धा वादाला सुरुवात होते. गावकरी एकमेकांवरती हमरीतुमरीवर येतात. शेवटी लेखक सर्वांना शांत करतो आणि यात्रेचा विषय काढतो. पण गावातील सर्व लोक यात्रेचा विषय काढताच म्हणाले, ''गावातील मंदिराचे काम झाल्याशिवाय आम्ही यात्रेची वर्गणी देणार नाही.''

लेखकाचे गावावरती नितांत प्रेम होते. स्वत: लेखक म्हणतो की, मी माझ्या गावी खूप दिवस गेलो नाहीतर गावातील झाडेझुडपे मला हाका मारू लागतात. शेवटी स्वत: लेखक गावापुढे उभा राहून म्हणतो, ''समजा, मंदिराचा जीर्णोद्धार करावयाचा निश्चय मी जाहीर केला. तर तुम्ही मला काय मदत करणार ? मला तुमचा पैसा नको. फक्त तुम्हा लोकांची अंगमेहनत हवी.'' (रानपालखी, पृ.१३५) लेखकाच्या या निर्णयाने गावसुद्धा आश्चर्यचकीत होते.

लेखक गावातील जाणकारांना पुन्हा विचारतो व त्यांना म्हणतात, ''बघा माघार घ्यायची नाही. आज तारीख पंचवीस मार्च. मला पंधरा एपिल रोजी उन्हाळ्याची सुट्टी सुरू होतेय. मी अठरा एप्रिलला येईन. मला मंदिर स्वच्छ हवं.'' (रानपालखी, पृ.१३५) लेखक गावाचा विचार घेतो. गावातील तरुण वर्ग तयार होतो. लेखक आपल्या घरी जातो. त्यावेळी त्याचे वडील होते. त्यांनी लेखकाच्या आईला सर्व घडलेला प्रसंग सांगितला आणि आपल्या वसंताने गावाच्या मंदिराचा जीर्णोद्धार

करायचं ठरविलंय त्यावेळी आई व बापूंना आनंद होतो. आईचा वसंतावरती विश्वास होता. पण पैसा कुठून आणायचा याची काळजी वाटते. त्यावेळी ती म्हणते, "चांगलंय पण त्याला पैका नकं व्हयं?" "गाव देईल."(रानपालखी, पृ. १३५) पण लेखक आईला म्हणतो गावचा पैसा नको. समाजकार्य करायचे म्हटल्यावर मी स्वत:च सर्व खर्च उचलणार आहे. असे लेखक आपल्या आईला सांगतो. आज वसंताने गाव शांत केला, याचा सर्वात जास्त आनंद त्यांच्या वडिलांना होतो.

लेखकाचे वडील आईला म्हणतात, "आज वसंतानं गाव शांत केलं. घितलीय जबाबदारी खांद्यावर. कसा पेलतोय त्याचे त्याला माहिती. तुला सांगतो, ते यादव नाना ... त्या देवळाच्या पायात त्यांनी दाढी वाढीवलीया. जोपर्यंत देऊळ पूर्ण होत न्हाय, तोपर्यंत दाढी काढणार नाहीत." (रानपालखी, पृ. १३६) वडिलांचे बोलणे ऐकून लेखक यात्रेपर्यंत मंदिराचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन देतो. बापूंना मात्र पैशाची काळजी असते.

काकांच्या मदतीने लेखक मंदिराच्या कामाची पूर्व तयारी करतो. लागणारे साहित्य याची यादी करतो. आणि आप्पा काकांना तुम्ही मला पूर्ण मदत करायची असे सांगतो आणि लेखक पाडव्याचा सण जेऊन गावाचा निरोप घेऊन नीरा गाठतो. लेखकाने घडला सर्व प्रकार आपल्या पत्नीला सांगितला. लेखकाची पत्नी त्यांना म्हणते एवढा घास घेतला. पण ते काम जमेल का ? पण लेखक मात्र घेतलेला निर्णय माघारी घेत नाहीत.

लेखकाला आता चैन पडत नव्हते. त्याने लगेच पावती पुस्तकाचा आराखडा तयार केला आणि छापखान्यात जाऊन त्याच्या वीस प्रती काढल्या. लेखकाचे नीरा या गावात तसे चांगले वजन होते. त्यांनी कामाची चार माणसे पहिल्यापासून जोडली होती. त्यातीलच नाना जोशी नेहमी लेखकास मदत करीत. लेखकाने नानांना ही बातमी सांगितली. नानांनी त्यांना लगेच मदतीचा हात दिला. लेखकाला पावती पुस्तक खपण्यासाठी प्रेट्रोल पंपावर बोलविले आणि पावतीपुस्तक खपण्यास सुरूवात झाली. मग मात्र मान वरती करण्यास वेळ मिळत नव्हता.

या कार्यात लेखकाला निरेतील जाणकार लोकांनी फार मोलाची मदत केली. थोड्याच दिवसांत पावती पुस्तके छापून लेखकाने पैसा जमविला. पण लेखक पत्नीला बजावून सांगतो मंदिराच्या पैशातील एकही पैसा आपल्या संसारात वापरायचा नाही. याची जबाबदारी पत्नी घेते. स्वत: लेखक पत्नीला म्हणतो जोपर्यंत मंदिराचे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत मी माझ्या व्याख्यानाचा एकही पैसा घरासाठी वापरणार नाही. दोघेही पती-पत्नी या कार्यात झोकून देतात. पत्नीसुद्धा संसारात असेल त्या पैशावरती घरखर्च चालवते.

योगायोगाने लेखकाला खटावच्या कॉलेजचे निमंत्रण आले. लेखकाने लगेच त्या प्राचार्यांना कळवले. मंदिराच्या कार्यास मदत हवी. मला हजार रुपये मानधन हवे. त्यांनी चारशे कबूल केले. त्या चारशे रुपयांनी सुरुवात झाली. लेखकाला व पत्नीला आनंद होतो. लेखक स्वत: पावती पुस्तके घेऊन आसपासच्या परिसरात फिरत होते. शिक्षकांनी सुद्धा या कामात लेखकाला सहकार्य केलं. सलग पंधरा दिवस लेखक फिरले. घरी वडिलांना पत्राने कळवतो पैसे तयार आहेत. कामकाज चालू करा.

लेखकाने थोड्या दिवसांत कॉलेजची कामे आटोपून गावी जाण्याचा बेत केला. जमलेली देणगी घेऊन त्यांनी कोरेगाव गाठले. मंदिरासाठी लागणारे साहित्य घेतले आणि गावी आले. लेखक गावात येतो. त्यावेळी गावातील वातावरण पूर्वी होते तसेच होते. घाण होती तशीच होती. तेवढे दाढी वाढविणारे नाना जोशी मात्र विटांचा एक ट्रक पाहून ''बोला बजरंगबली की ऽऽऽ'' अशी गर्जना केली. त्यांच्या गर्जेनेने सुस्तावलेला गाव जागा झाला. प्रत्येकाने आपल्या घरचे टिकाव खोरी आणून अंगमेहनत करण्यास सुरुवात केली.

गाव कामाला लागले. कधी मंदिराकडे न फिरणारी माणसे सुद्धा कामाला लागतात. गावातील लोकांनी स्वत: बैलगाड्यांनी वाळू आणण्यास सुरुवात केली. गाव मदतीसाठी पुढे आले. गावातील वृद्ध जाणकार कीर्तनकार लोक लेखकाला तुम्ही चांगले कार्य केले. त्याचा तुम्हाला चांगला आशीर्वाद मिळेल. गावातील लोकांचे कष्ट पाहून लेखक म्हणतो आता काम पूर्णच होणार.

भिंतीपूर्ण होताच लेखक कोरेगाव गाठतो. गावातील लोकांना घेऊन त्यांनी लगेच लादी आणली. कलाकार गवंडी ती लादी बसवतो. गावातील लोक नेहमी लेखकापाशी रेंगाळत असायची. त्याने लेखकाला समाधान वाटत होते. सगळेच लोक पैसे देण्यासाठी उत्सुक होते. पण लेखक घेण्यास तयार नव्हता. तशी गरज सुद्धा भासत नाही.

गावातील विश्वासआण्णा लेखकाला म्हणतात, ''कमरेला नोटा लावून माणसं वाट बघत्यातील. आता वसंतराव त्यास्नी निराश करू नका. रंगाला लागणारा पैसा गाव देईल. आता तुमी लय रगात आटवू नका. राव चार-पाच ट्रक विटा, तीन ट्रक सिमेंट, दोन-तीन ट्रक फरशी. सगळं तुमी आणलं. वर मजुरी आहेच. गावकऱ्यांस्नी तेवढा रंग तरी देऊ द्या.'' (रानपालखी, पृ. १६)

विश्वास आण्णाचं बोलणे लेखक मानतो आणि लगेच माणसांची यादी करतो. पारावरती बसल्या जागेवर नऊ हजार जमतात. लेखक गावकऱ्यांच्या मदतीने गावात देणगी मागतो. गावातील बऱ्याच लोकांनी देणगी दिली. गावातील मंदिराच्या कामास कुणीच नकार दिला नाही. अखेर मंदिराचे

काम पूर्ण होते. गावात रंगकाम करणारी खूप माणसे होती. त्यांच्या मदतीने रंगकाम पूर्ण केले जाते. गावातील माणसे मंदिरात कौतुकाने येऊ लागतात.

मंदिराचा जीर्णोद्धार झाला. उद्घाटन समारंभ करण्याची वेळ येते. गावकरी लेखकाला उद्घाटनासाठी पाहुणा तुम्हीच ठरवा असे सांगतात. उद्घाटनासाठी लेखक प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना आणतो. शिवाजीराव भोसले लेखकाला म्हणतात, ''तुम्ही जन्मगावासाठी मंदीराच्या जीर्णोद्धाराचे कार्य केले पण ज्या ठिकाणी तुम्ही राहता त्या नीरा गावासाठी काहीतरी करा.'' लेखकाच्या मनात नीरा या गावाबद्दलही प्रेम होतेच. पण त्यासाठी योग्य माणसांची गरज हवी होती. लेखक, नाना जोशी आणि मुबारकभाई यांची गाठ पडते. त्यावेळी नाना जोशी लेखकाला म्हणतात, ''सर, या नीरा गावात एखादी व्याख्यानमाला सुरू करूया.'' (रानपालखी, पृ. १४२) लेखक लगेच तयार होतो. नाना जोशी मानधनाची जबाबदारी घेतात. लेखक वक्त्यांची जबाबदारी घेतो आणि नीरा या ठिकाणी लेखकाने व त्यांच्या साथीदारांनी 'झंकार व्याख्यानमाला' सुरू केली.

त्यासाठी नावाजलेले वक्ते शिवाजीराव भोसले, नारायण सुर्वे, विश्वास मेहेंदळे, जगदीश खेबुडकर, गणपत पाटील अशा अनेक वक्त्यांनी झंकारचे व्यासपीठ गाजविले. त्या सर्व वक्त्यांची उठाठेव स्वत: लेखक करत होते. लेखकाच्या पत्नीला त्या सर्व लोकांच्या जेवणाची व्यवस्था करावी लागते. त्याकाळात लेखकाला वक्त्यांचा चांगला सहवास लाभला. त्याच्या घरी अनेक वक्त्यांनी मुक्काम केला.

लेखक व त्याचा भाऊ प्रकाश ज्या गावातील ग्रंथालयात वाचन करायचे ते ग्रंथालय आता बंद पडले होते. ते चालू करावे असे लेखकाला वाटते. आज आपल्या गावातील ग्रंथालय चालू झाले तर गावातील चार पोरं अक्षरांशी खेळतील असा विचार लेखकाच्या मनात येतो. लेखकाने तीन दिवसांची रजा टाकली आणि लेखक अच्युतरावला घेऊन मुंबईला जातो. त्यांचा विचारविनिमय करून लेखक निरेला येतो. ग्रंथालयाला देण्यासाठी स्वत:ची काही पुस्तके बाजूला काढतो आणि पुण्याला जाऊन पुस्तके विकत घेतो. त्यासाठी त्याच्या कॉलेजच्या ग्रंथपालांचे मार्गदर्शन घेतो. ग्रंथालयासाठी लागणारे पैसे स्वत:चे व सहकार्यांचे घालून लेखकाने ग्रंथालय उभे करायचे ठरविले.

ग्रंथालयाची उभारणी करण्यात आली. लेखकाला या कार्यात अनेकांनी सहकार्य केले. स्वत: लेखकाने पुढाकार घेऊन ग्रंथालयाची स्थापना केली. ग्रामपंचायतीच्या खोलीत ग्रंथालय सुरू होते. चार-सहा महिने ग्रंथालय चांगले चालते. पंचवीस रुपये फी ठेवली जाते. परंतु ग्रामपंचायतीने ग्रंथालय

इथून हलवा असे सांगितले. जागेची पंचायत होती. त्यासाठी दोन कामाला पोरं ठेवली. वर्तमानपत्राचे बील सुद्धा स्वत: भरत. परंतु याचे गावाला काहीच वाटत नाही. लेखकाची झोप उडते. ग्रंथालयासाठी दोन खणाची इमारत उभी करायला पाहिजे असा विचार लेखक करतो.

ग्रंथालयासाठी खोली बघायची या विचाराने लेखक मुंबईला जातो व मोरे साहेबांच्या मदतीने ग्रंथालयाच्या खोलीसाठी पैसे आणतो. त्या पैशातून मारुतीच्या मंदिराशेजारी ग्रंथालयाची खोली उभी करतो. चार दिवसांनी ग्रामपंचायतीतून ग्रंथालय स्वत:च्या मालकीच्या खोलीत आणतो. टेबल, कपाट, खुर्च्या मांडून ग्रंथालय पुन्हा चालू होते. त्यासाठी गावातील अनिल बोधे व सुनील यादव या दोघांना ग्रंथालय चालवण्याची जबाबदारी देतो.

लेखक १९९० ते १९९७ गेली सात वर्षे गावची यात्रा स्वत: भरवत होता.लेखकाला गावासाठी चांगले कार्य करण्यात मोठा आनंद असायचा. त्यासाठी त्यांनी गावातील चांगली वरिष्ठ माणसे ज्यांना गाव मानतो अशी माणसे हाताशी धरली होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सात वर्षे यात्रा भरविली होती.

अच्युतरावांनी लेखकाला यात्रेविषयी पूर्व कल्पना दिली. यावर्षी गाव तुमच्या विरोधात आहे. गावातील माणसे फार विचित्र वागतात. यात्रा यंदा चांगली होणार नाही. पण लेखकाला ते पटत नाही. लेखकाला अच्युतराव सांगतात, तुमच्या आळीतील लोकांना तुमचा मोठेपणा पाहवत नाही. तुम्ही या यात्रेत सहभाग घेऊ नका. शेवटी यात्रेचा विचार येतो. लेखक नेहमीप्रमाणे यात्रेची वर्गणी गोळा करण्यास सुरुवात करतो.

यात्रेचे आठवे वर्ष लेखकाला त्रासदाय ठरले. यात्रेच्या दिवशी गावातील वातावरण तंग होते, वाद होतो. इनामदाराची पोरं दारू पिऊन दंगा घालतात. लेखकाला वर्गणी देत नाहीत. लेखक घरी जातो. तेवढ्यात गावातील मुले तमाशाच्या गाडीवर दगडे फेकणार याची बातमी त्याला कळते. कुस्त्याचा फड सुरू होतो. त्यात पण वाद होतो. शेवटी तमाशाला सुरुवात होते. त्यावेळी गावातील मुलांनी दंगा घातला. वर्गणीची ओरड होते. शेवटी वातावरण तापते. तमाशा मध्येच बंद करावा लागतो.तमाशा मालकाला विनंती करून लेखक त्यांना जमलेली देणगी मानधन म्हणून देतो. लेखक व तमाशाचा मालक यांची फार मैत्री होती. त्यांची माफी मागतो. नानांना लेखक म्हणतो, ''नाना हा शेवटचा प्रयोग, इथून पुढे आम्ही तुम्हाला त्रास द्यायला येणार नाही.''

लेखकाला यात्रेचे आठवे वर्ष फार कठीण गेले. तेव्हापासून लेखक व त्यांचा भाऊ दोघेही ठरवतात. आता ही शेवटची यात्रा. तेव्हापासून दोघेही गावापासून पूर्ण लांब होतात. गावासाठी त्यांची आता भावना बदलते. गावासाठी एवढे, सर्व करून गावाने शेवटी दु:ख दिले याची जाणीव होते.

लेखकाने स्वत: शेतीत लक्ष घातले. गावातील एका व्यक्तीची वाट्याने जमीन करतो. घरची जमीन नांगरून घेतो. त्यात थोडी फार मशागत करतो. पण त्यात फारसा फायदा होत नाही हे लक्षात येताच त्याने त्या शेतीचा नाद सोडला. लेखकाला आता सुखाचे दिवस येतात. नीरा या ठिकाणी लेखक चांगला स्थिरावला होता. त्यामुळे त्याचे आई-वडील त्याच्याकडे येऊन आनंदाने राहतात. बापू तसे निवांत असायचे. मटका खेळणे, संध्याकाळी दारू पिणं. लेखक त्यांची सर्व सोय करीत.

लेखकाची पत्नी सरळमार्गी होती. गावाकडे नेहमी जायचा पण कामापुरताच. घरातील लोक त्यांच्याकडे मधूनअधून येत होते. लेखकाने स्वत: क़ष्ट करून पैसा कमवला आणि स्वत:ची निरेत जागा घेतली. काही दिवसाने लेखकाने तिथेच बंगला बांधला. त्यावेळी बापू त्या बंगल्यात आनंदाने रहात होते. त्यांनी ग्रामीण भागातील कष्टकरी लोकांचे जीवन साहित्यातून चित्रित केले. भटक्या जमातीवरती त्यांनी लेखन केले.

लेखकाच्या घरात आनंदाचे वातावरण होते. प्रकाशराव, उत्तमराव यायचा. लेखकाला अभिमान वाटायचा. लेखक सर्वांची काळजी धेत. आई-बापूंच्या तब्येतीची चांगली काळजी प्रकाशराव जास्त घेत. लेखक नीरा येथे असल्याने त्यांना फार लक्ष देता येत नाही. तरी लेखक स्वत: गावी जात असे.

शेतीच्या कामानिमित्त लेखक व त्याचा भाऊ घरी असतात. त्यावेळी शेतात दोघे काम करीत होते तेव्हा बापूंची तब्येत पूर्ण खालावते. त्यांनी बापूंना सातारला घेऊन जाण्याची तयारी केली.

लेखक बापूंना उठवून बसवत होता. त्याचवेळी बापूंनी लेखकाच्या हातावर मान टाकली आणि लेखकाच्या घरावर दु:खाचा डोंगर कोसळतो. बापूंच्या मृत्यूने सर्वजण दु:खी होतात. नोकरीसाठी सर्व भावंडे थोड्याच दिवसांत आपल्या मार्गाने निघून जातात. राहते फक्त लेखकाची आई. ती मात्र गावीच राहते. लेखक मात्र गावी आईसाठी येतो. आईला मात्र गाव सोडवत नसे. ती त्याच मातीत कष्ट करते. त्या घरात तिने उरले आयुष्य काढले.

बापूंच्या मृत्यूनंतर लेखकाची आई मुलांच्याकडे थोडे फार दिवस राहते पण तिला कष्टाशी सवय होती. ती गावीच राहते. ती सुद्धा लेखकाला आधार देत नाही. गावातील शेतीत कष्ट करून

तिचेही शरीर खंगते. पुढे ती सुद्धा देवाघरी जाते आणि लेखकाच्या घराला कुलूप लागते. आई गेल्यापासून लेखक व त्यांचे दोन भाऊ त्यांच्या जन्मगावाचे पाहुणे होतात.

लेखकाने खूप सहन केले. खूप दु:ख पचविले. लेखकाला या पंचवीस वर्षांच्या काळात अनेक व्यक्ती भेटल्या. त्यांनी घेतलेला सर्व अनुभव काहीही न लपवता यातून मांडले आहेत.

**सारांश :**

'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत आत्मकथनाचा आशय मांडणे महत्त्वाचे ठरते. त्याचबरोबर आत्मकथनातील सर्व घटना प्रसंग त्याचबरोबर व्यक्तिरेखा यांची सर्वांग माहिती समजण्यासाठी आशय मांडणे महत्त्वाचे ठरते. म्हणून प्रस्तुत प्रकरणात 'कोकरउड्या व रानपालखी' या आत्मकथनाचा आशय मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

१. 'रानपालखी' या आत्मकथनाची भाषा नागर व ग्रामीण शैलीच्या सीमारेषेवरील बोलीभाषा असून काही पारिभाषिक शब्दांचा समावेश त्याच्यात झालेला दिसून येतो.

२. 'रानपालखी'तून लेखकाने आपल्या गावाचे सण-उत्सव, यात्रांचे चित्रण अत्यंत संवेदशनशीलतेने केले आहे.

३. 'रानपालखी'तून मध्यमवर्गीय समाजाचे राहणीमान, जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष याचे चित्रण दिसून येते.

४. 'रानपालखी'तून व. बा. बोधे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू अधोरेखित झाले आहेत.

५. रानपालखीची भाषा व संवाद साधे सोपे असून त्यामुळे आत्मकथनाची परिणामकारकता वाढते.

६. रानपालखीतील व्यक्तिरेखा या आशयाची परिणामकारकता वाढवितात.

७. रानपालखीचे मुखपृष्ठ व शीर्षक आशयाची सुसंगत आहे.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | बोधे व. बा. | : | 'कोकरउड्या' अक्षरबंध प्रकाशन, रविकिरण नीरा, द्वितीयावृत्ती, ऑगस्ट २००६ |
| | तत्रैव | : | पृ. २६ |
| | तत्रैव | : | पृ. २५ |
| | तत्रैव | : | पृ. ६० |
| | तत्रैव | : | पृ. १९४ |
| २. | बोधे व. बा. | : | 'रानपालखी' संस्कृती प्रकाशन, पुणे, ४११००५ जानेवारी २००३ |
| | तत्रैव | : | पृ. ५ |
| | तत्रैव | : | पृ. १२ |
| | तत्रैव | : | पृ. १३ |
| | तत्रैव | : | पृ. १३५ |
| | तत्रैव | : | पृ. १३५ |
| | तत्रैव | : | पृ. १३६ |
| | तत्रैव | : | पृ. १४० |
| | तत्रैव | : | पृ. १४२ |


-----x-----